# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७/ 1929 दि. 17/7/17

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य,
सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१७-१८/८३१२, दि.१३.०७.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौदध, पारशी व जैन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ साठी ऑनलाईन पदधतीने राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पदधतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे संकेतस्थळ www.dhepune.gov.in या संकेतस्थळांशी देखील जोडलेले (Link) आहे. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४८३०२ संच निर्धारित केलेले असून त्यापैकी ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत. **केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.३१ ऑगस्ट २०१७ व नूतनीकरणासाठी दि ३१ जुलै २०१७ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रीक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पदधती, संकेतस्थळ तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत मा. संचालनालयाच्या वतीने राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिध्दी दिलेली आहे. (जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे.) तसेच मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

SOP व मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी कार्यवाही करावी. तसेच सदर योजनेबाबत होणाऱ्या नवीन/सुधारणांबाबत उपरोक्त संकेतस्थळाचे व मा. संचालनालयाच्या संकेतस्थळाचेही अवलोकन करावे व तशा सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

महाविद्यालयांनी रु.५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे UPLOAD न करता रु.५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत UPLOAD करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी जोडलेली कागदपत्रे व भरलेली माहिती काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्जावर पुढील योग्य ती कार्यवाही करावी. सदर कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावीत.

तसेच महाविद्यालयांनी अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी अंतिम दिनांकाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुनच अर्जाची तपासणी व पडताळणी करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड करावेत.

तरी सर्व पात्र महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी त्यांच्या महाविद्यालयांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी संबंधित प्राचार्य / विभागप्रमुख यांनी मा. संचालनालयाकडून प्राप्त सोबत जोडलेले **पोस्टर आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनीय सूचना फलकावर लावून** सदर योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच सोबत जोडलेल्या जाहिरातीनुसार व संकेतस्थळावर दिलेल्या अटींच्या अधीन राहून तसेच वैयक्तीक लक्ष घालून विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक त्यांचे बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. तसे लिंक झालेले नसल्यास सदर विद्यार्थ्यांस त्याचा आधार क्रमांक बँक खाते क्रमांकाशी लिंक करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच सदर शिष्यवृत्ती मंजूर झाली असता मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही आधार संलग्न बँक खात्यातच जमा होणार असल्याने विद्यार्थ्यांनी अर्जांमध्ये बँक खात्याची माहिती भरताना ज्या खात्याला आधार क्रमांक लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याची माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे बँक खात्याची माहिती जसे **A/c No., Bank Name, Branch Name, IFCS व MICR Code तसेच चालू असलेला मोबाईल क्रमांक** इत्यादी बिनचूक व परिपूर्ण भरावी. तसेच नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याच्या पासबुकवर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव भरुन नोंदणी करावी. जेणे करुन शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास ती विद्यार्थ्यांना विनाविलंब मिळेल. तसेच सदर योजनेबाबतची पुढील माहिती, उपक्रम वेळोवेळी आपणांस कळविण्यात येतीलच.

**टिप:** अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल परंतू त्याच्याकडे आधार नोंदणीची पावती (EID No.) असेल तर तो नमूद करावा. तसेच एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड अथवा नोंदणीची पावतीही नसेल (म्हणजेच त्याने आधार कार्डाकरीता कोणतीच कार्यवाही केली नसेल) तर अशा विद्यार्थ्याला आधार कार्ड नोंदणी केंद्राची व आधार कार्डाच्या महत्वाची माहिती देऊन त्यास आधार कार्ड काढण्यास प्रोत्साहीत करावे. आधार कार्ड केंद्रांची माहिती http://resident.uidai.net.in तसेच https://uidai.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सोबतः संदर्भिय पत्र व जाहिरात.

करीता 15/07/2017

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रतः

१. मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.
२. विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ ठाणे, पालघर व रायगड विभाग, नवी मुंबई.
३. विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ रत्नागिरी व सिंधुदुर्ग विभाग, रत्नागिरी.
४. विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, कोकण विभाग, मुंबई